Vol 2 Issue 10 April 2013

Impact Factor : 0.1870

ISSN No :2231-5063

Monthly Multidisciplinary Research Journal

# GoldenResearch Thoughts

Chief Editor
Dr.Tukaram Narayan Shinde

Publisher
Mrs.Laxmi Ashok Yakkaldevi

Associate Editor
Dr.Rajani Dalvi

Honorary
Mr.Ashok Yakkaldevi

**IMPACT FACTOR : 0.2105**

**Welcome to ISRJ**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2230-7850**

Indian Streams Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial Board readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## *International Advisory Board*

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya [ Malaysia ]

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus Pop

Mohammad Hailat
Dept. of Mathmatical Sciences, University of South Carolina Aiken, Aiken SC 29801

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Catalina Neculai
University of Coventry, UK

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Postdoctoral Researcher

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Department of Chemistry, Lahore University of Management Sciences [ PK ]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Horia Patrascu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

Nawab Ali Khan
College of Business Administration

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University, Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University, Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary, Play India Play (Trust),Meerut

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU, Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Ph.D , Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.isrj.net**

Golden Research Thoughts
Volume 2, Issue. 10, April. 2013
**ISSN:-2231-5063**
Available online at www.aygrt.isrj.net

ORIGINAL ARTICLE

# *चाफा बोलेना चाफा चालेना ......*

***शरद जे. मेश्राम***

एस. एस. जायस्वाल महाविद्यालय
अर्जुनी मोरगाव जि. गोंदिया

***सारांशः***

चाफा बोलेना चाफा चालेना
चाफा खंत करी काही केल्या फुलेना

हे लतादीदींनी गायिलेले आणि वसंतप्रभूंनी संगीतबद्ध केलेले कवी बी यांचे अप्रतिम गीत न ऐकलेला मराठी रसिक मिळणे अशक्य आहे. बींनी रचलेल्या सर्व कवितांपैकी सर्वाधिक लोकप्रियता लाभलेली कविता म्हणजे 'चाफा' असे म्हणणे चूक ठरू नये. केशवसुतांचे समकालीन असून, आपल्या काव्यात नवनवीन विषय हाताळून, नवे प्रयोग करूनही कवी बी मात्र मुख्य प्रवाहापासून थोडे दूर राहिले. त्यांच्या काव्यातून सामाजिक, राजकीय तसेच आध्यात्मिक जाणिवा आढळून येतात. त्यांची प्रेमकाव्ये ही नायिकाप्रधान असून आपल्या प्रियकराच्या सहवासाला दुरावलेल्या अशाच आहेत. प्रस्तुत लेखातून त्यांच्या काव्यातील स्त्री प्रतिमा वाचकांपुढे मांडण्याचा हा अल्पसा प्रयत्न आहे.

## *प्रस्तावना :–*

### *कवी बी यांच्याविषयी थोडेसे....*

कवी बी यांचे पूर्ण नाव नारायण मुरलीधर गुप्ते असे आहे. त्यांचे वडील मुरलीधरपंत हे श्रीमंत घराण्यातले. त्यांचे घराणे मूळचे कुलाबा जिल्ह्यातील वाशी या गावचे. तिथल्या सहा सात गावचे कुलकर्णीपण त्यांच्याकडे होते. पण पुढे आर्थिक परिस्थिती खालावली आणि मुरलीधरपंत हे इ.स. 1851 मध्ये कुलाबा सोडून वऱ्हाडात आले.

कवी बी यांचा जन्म दि. 1 जून 1872 मध्ये मलकापूर जि. –बुलढाणा येथे झाला.त्यांचे शिक्षण यवतमाळ व पुढे अमरावती येथे झाले. दरम्यानच्या काळात वडिलांच्या अकस्मात मृत्यूमुळे त्यांना मॅट्रीकही होता आले नाही व त्यांना सरकारी कारकुनाची नोकरी पत्करावी लागली.

कवी बी यांची एक बाळूमावशी बालपणीच विधवा झाल्याने यांच्याकडेच राहत होत्या. कर्मठ नसलेल्या व सुधारकी बाण्याच्या असलेल्या मावशीच्या विचारांचा बी वर फार मोठा प्रभाव पडलेला जाणवतो.

बी वयाच्या 19 व्या वर्षापासूनच काव्यलेखन करू लागले. ते अतिशय चारित्र्यवान होते. त्यांना प्रसिद्धीचा हव्यास नव्हता. संस्कृत, इंग्रजी, व प्राचीन मराठी काव्य वाङ्मयाचा त्यांचा व्यासंग होता. त्यांची पहिली कविता 'प्रणयपत्रिका' हरिभाऊंच्या 'करमणूक'मध्ये दि. 3 ऑक्टोबर 1891 ला प्रसिद्ध झाली. इ.स. 1891 ते 1911 या काळात त्यांनी विविध टोपण नावाने गद्यलेखनही केले असल्याचे समजते. त्यांची 'वेडगाणे' ही कविता जुलै 1911 मध्ये 'मनोरंजन' मध्ये प्रकाशित झाली आणि तेव्हापासून त्यांच्याकडे रसिकांचे लक्ष वेधल्या गेले. ही कविता बी याच टोपणनावाने प्रसिद्ध झाली. ते आधी 'भुंगा' हे टोपण नाव ठेवणार होते. पण त्यांचे यवतमाळचे मित्र शंकर विठ्ठल दीक्षित यांनी त्यांना 'बी' हे नाव सुचविले व कोणत्याही नावाशी वाकडे नसल्यामुळे त्यांनी त्याचा स्वीकार केला. दि. 10 जुलै 1934 रोजी श्री.गो. देशपांडे यांनी त्यांच्या कविता 'फुलांची ओंजळ' हे शिर्षक देऊन काव्यसंग्रह प्रकाशित केला.

पत्नीच्या निधनानंतर 14 वर्षे ते जावई खंडेराव प्रधान यांच्याकडे राहत असत. एकाएकी हृदयक्रिया बंद पडून दि. 30 ऑगस्ट 1947 ला वयाच्या 76 च्या वर्षी छिंदवाडा येथे त्यांचा मृत्यू झाला.

### *कवी बी यांच्या काव्यातील स्त्री प्रतिमा*

बी यांच्या काव्याचा एकूण विचार केला तर त्यामध्ये विविध विषय त्यांनी हाताळलेले दिसतात. त्यांची प्रेमगीतेही अधिकच प्रसिद्ध झालेली आहेत. त्यांच्या प्रेमगीतातील नायिका ही वाचकांना आपल्या प्रेमामध्ये पाडून घेण्याइतकी सुंदर आणि समर्थ आहे. बींची 'प्रमिला' खरोखर जवळून निरखून पाहण्यासारखी आहे. त्यामध्ये त्यांनी केलेले बारीकसारीक वर्णन खरोखरच विलोभनीय आहे. कवी लिहितात की, सूर्यासारखी दिव्यता तिच्या नयनात असून ती सर्वत्र मांगल्य संपन्नता वितरित करते. तिचे हात कमळाच्या देठासारखे असून झोपत मंदस्मित करणारे तिचे मुख अवर्णनीयच आहे. जणू स्वच्छ आकाशात एखादे नक्षत्रच चमकत आहे की काय असे वाटते. शेवटी कवी लिहितात,

**Title :** *चाफा बोलेना चाफा चालेना ......*
**Source:Golden Research Thoughts [2231-5063]** *शरद जे. मेश्राम* **yr:2013 vol:2 iss:10**

'' वाहे ती सरिदोघ, जोवरि असे तो भूवरी भूधर,
नक्षत्रांसह चंद्रसूर्य असती व्योमांत की जोवर,
राहो तोवर ही अशीम विशमा निद्रिस्त रामा स्थिर,
मी राहीन असाच पाहत उभा हे चित्र लोकोत्तर''

यावरून त्यांच्या कल्पनाशक्तीची ओळख पटते.

बींची 'चाफा' कविता तर अविस्मरणीयच आहे. हे गीत म्हणजे शुद्ध प्रेमाचे नितांत सुंदर सुक्तच आहे. येथिल नायिका म्हणजे साक्षात प्रेमाची मूर्ती, प्रेमाच्या वर्षावात ओथंबून चिंब झालेली, अत्यंत आतूर झालेली निष्कपट व निर्व्याज भावनेची मैत्रिण, गंभीर वृत्ती धारण करून बसलेल्या आपल्या जिवलग मित्राला 'चाफा' कल्पून हे गाणे म्हणत आहे. एवढा अर्थ लक्षात घेतला की ही कविता समजायला काहीच कठीण नाही आणि पुढल्या सर्व कल्पना वाचकांपुढे आपोआपच उलगडत जातात. रूसलेल्या चाफ्याला (प्रियकराला) खुलविण्यासाठी, फुलविण्यासाठी ती काय काय खटपटी करते, ती त्याच्यासोबत आंब्याच्या बनात, केवड्याच्या बनात जाते. मैनेच्या गळ्यात गळा मिळवून गाणे गाते, निसर्गातील अनेक प्रेमदृश्ये ती त्याला दाखविते. निसर्गातील प्रेमलिला पाहून तिची आर्तता वाढते. ती त्याला म्हणते की, हे विश्वाचे अंगण आपल्याला आंदण मिळालेले आहे, पण ते आपल्या प्रेमाच्या पासंगालाही पुरावायाचे नाही. कारण आपले प्रेम कामुक, शारीरिक नाही. हे ती पुढील ओळींमधून पटवून देते,

''जन विषयाचे किडे,
यांची धाव बाह्याकडे
आपण करू शुद्ध रसपान.''

असे म्हणताबरोबर त्या प्रियकराला अतिशय आनंद होतो आणि त्याच्या शरीरावर रोमांच उभे राहतात आणि ते दोघेही देहभान विसरून कडकडून भेटतात. या प्रसंगाचे शेवटचे वर्णन कवी बी यांनी अतिशय उत्कृष्टपणे केलेले आहे.

'' चाफा फुली आला फुलून
तेजी दिशा गेल्या आटून
कोण मी– चाफा?कोठे दोघे जण !''

त्यांच्या या भेटीनंतर ती आणि चाफा आपले स्वतःचे अस्तित्वच विसरून गेले. ते दोघे उरलेतच नाहीत, तर ते एकच झालेत असे कवी म्हणतात.

'दीपज्योतीस' या रूपकात्मक काव्यातून एका बालविधवेचे साकारलेले चित्र लक्षवेधक आहे. कवी त्या बालविधवेला उद्देशून म्हणत आहेत की, निसर्गाने जी मातृत्वाची दिव्य शक्ती दिलेली आहे त्याची स्त्री जातीने उपेक्षा करू नये. कारण कोणतीही शक्ती निसर्ग कोणाला दान देत नाही, तर ती कर्ज म्हणून देत असते आणि त्या कर्जाची व्याजासह परतफेड करणे हे प्रत्येकाचे कर्तव्य आहे.

''हे लोकोत्तर रूप  तेज तुजला आहे निसर्गे दिले,
की तू अन्य तशीच निर्मुनि जगा द्यावीस काही फले,
दाने दे न कुणा निसर्ग! धन तो व्याजे तुम्हा देतसे
तें त्याचें ऋण टाक फेडुनि गडे! राजीखुशीने कसे!''

कवी बी यांची ही कल्पना अत्यंत चिंतनीय आणि विचारशील असल्याचे प्र. के. अत्र्यांना वाटते.

दि. 14 सप्टेंबर 1891 ला बींनी लिहिलेली पहिली कविता 'प्रणयपत्रिका' मध्ये एका विरहिणीचे उत्कृष्ट चित्र कवीने रेखाटले आहे. पतीच्या विरहामध्ये तडफडणारी स्त्री क्षणोक्षणी आपल्या पतीची आठवण करीत आहे आणि आसुसलेल्या नजरेने त्याच्या पत्राची वाट पाहत आहे. आपल्याशिवाय त्याचा एक क्षणही जात नव्हता हे तिला आठवते....

'' क्षणभर अपुल्या मी दृष्टीआड होता,
करमत नव्हते ना आपल्या थोर चित्ता?
विविध मिश करावे काम काही करिता
मजविण मग कैसा कंठिता काळ आता''

सतत कोणत्या ना कोणत्या मिशाने आपल्या मागे पुढे राहणारा आपला पती आता आपल्याविना कसा जगत असेल?असाा तिला प्रश्न पडतो व ती शेवटी लिहिते की, तुम्ही आपली सर्व कामे बाजूला सारून कमीतकमी मला ख्यालीखुशालीचे दोन ओळींचे पत्र तर लिहा! याशिवाय तिचे दुसरे कोणतेही मागणे नाही.

कवी बींच्या पहिल्या कवितेच्या मानाने त्यांचा हा प्रयत्न नजरेत भरण्यासारखा, वाखाणण्यासारखा आहे.

कवी बी यांचे अत्यंत सुंदर व गाजलेले कथाकाव्य म्हणजे 'कमळा'.  या कवितेतील कवीची वर्णनशैली, त्यांचा मराठमोळेपणा, आणि ओघवतेपणा हे विशेष गुण त्या काव्यातील करूण रस मराठी मनाला पाझर फोडणारा आहे. कवीने वर्णिलेली प्रसंगांची व दृश्यांची मालिका 'फोटोग्राफी'सारखी वाटते.

विवाहाची खोटी आशा दाखवून संभाजीने साध्या भोळ्या कमळाला पळवून नेऊन शिवनेरी मध्ये ठेवले. तिलाही तो आवडत होता पण विधीरहित आलिंगन व चुंबनाने तिच्या कौमार्यभंगाचा जो कलंक लागला होता तो विवाहामुळे धुतला जाईल या आशेवर ती जगत होती. पण शेवटी फसगत झाल्याने  तिच्यासमोर एकच मार्ग उरला आणि तोच तिने पत्करला. तिने किल्ल्याच्या खिडकीतून खाली उडी घेतली. कवी बी यांच्या अलौकिक प्रतिभाशक्ती व कल्पनाशक्तीचे दर्शन या कवितेच्या ओळीओळीतून जाणवते.

'कमळा' बद्दल डॉ. अक्षयकुमार काळे लिहितात, ''कथासूत्र फारसे गुतागुतीचे नसले तरी बींनी अत्यंत अन्वर्थक कल्पनांनी आणि अचूक शब्दयोजनेने ते फुलविले आहे. बींचा वैचारिक काव्यस्वभाव  'कमळा' काव्याची सुरूवात करतांनाही उफाळून आला आहे, परंतु तो पुढे तसाच

राहिला असता तर ओघवत्या वर्णनशैलीला मारक ठरला असता. पहिल्या आठ ओळी सोडल्या तर दार्शनिक निश्कर्शाला येण्याची त्यांची सवय कुठे नडलेली दिसत नाही. इतका कथनाचा ओघ निरंतर व शांतगंभीर वाहत राहिला आहे.

'' कोमल आहे कोणी शामा चिंताकूल बसली,
लावण्याची किशोरगंगा वाट काय चुकली?
मुसावला नीलिमा तोच हा नीलदेह रमणी
निळ्या सारणीमध्ये वाहते मोत्याचे पाणी''

रूढनायक संकल्पनेचा वापर न करताही शोकान्त कथाकाव्य किती प्रत्ययकारी होऊ शकते याचे 'कमळा' हे अत्युत्कृष्ट उदाहरण आहे.''

कवी बी म्हणजे न संपणारा विषय. शेवटी आचार्य अत्रे ' फुलांची ओंजळ' च्या प्रस्तावनेत म्हणतात तेच खरे, '' इतर कवींशी तुलना केल्याने बींचे वैशिष्ट्य चटकन नजरेत भरते. केशवसुतांच्या काव्यात ओजस्वी तत्त्वज्ञान आहे पण कलेचा रेखीवपणा नाही. गोविंदाग्रजांच्या काव्यात कला व सौंदर्यप्रीती आहे, पण जीविताबद्दलचा सुसंगत विचार नाही. रे. टिळकांच्या काव्यात साधेपणा व प्रेमळता आहे पण कल्पनेची विशालता व ऐश्वर्य नाही. बालकवींच्या काव्यात नादमाधुर्य व तत्त्वसंशोधनाचे वेड आहे, पण सत्याचा प्रकाश नाही. या सार्‍या दुर्मीळ गुणांचा समुच्चय बी कवींच्या कवितेत आढळून येतो. कलावंत, तत्त्वज्ञ व सौंदर्यवादी कवी या नात्याने आधुनिक मराठी कवींमध्ये कवी बी यांचे स्थान फार मोठे आहे''

***संदर्भ :–***

1) फुलांची ओंजळ
2) कवी बी– आकलन व आस्वाद – डॉ. शा.वा. स्वान
3) अर्वाचीन मराठी काव्यदर्शन – डॉ. अक्षयकुमार काळे

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal
# For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished research paper.Summary of Research Project,Theses,Books and Books Review of publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium    Scientific
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- EBSCO
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database

Golden Research Thoughts
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.isrj.net